**फौजदारी नियमावली (मॅन्युअल) च्या परिच्छेद १८ (१) वगळण्यात आल्यामुळे तसेच साक्षीदाराची आणि न्यायालयाची एकच भाषा मराठी असल्यामुळे कलम २७७ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये थेट आणि फक्त मराठीत साक्ष नोंदविण्यात आली असे.**

**सत्र खटला क्र.–८३९/२०२५**
**सरकार वि. दिक्षा गीरगुसे**
**नि.क्र. ४३**

## सरकारतर्फे साक्षीदार क्र.०९ यांची जबानी

**साक्षीदारास शपथ देण्यात आली. मी देवाची शपथ घेतो की मी जे काही सांगेन, खरं सांगेन, पूर्ण खरं सांगेन आणी खरंशिवाय काही सांगणार नाही.**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो/ करते की,

माझे नाव – धिरज संजय रेहेपाडे ,
वय – २४ वर्ष, व्यवसाय – खाजगी नौकरी
राहणार – लक्ष्मी नगर, वडधामना, नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री एल. बी. शेंद्रे यांचे द्वारे शपथेवर सुरु–**

०१. मी रिलायंस वेअर हाऊस, मोहपा तह. कळमेश्वर येथे ५ वर्षांपासुन सुपरवायजर म्हणुन कार्यरत आहे. मी अतुल कानफाडे यांना ओळखतो. ते ड्रायव्हर म्हणुन माझ्या कंपनीत काम करत होते.

०२. दि.१८.०१.२०२४ रोजी अतुल कानफाडे यांच्या गाडीचे नियंत्रण सुटल्यामुळे त्यांचा अपघात झाला होता. अतुल कानफाडे यांचा जखमी होऊन मृत्यु झाला होता. त्यासंदर्भात मला सावनेर पोलीस ठाणे येथुन दि. १३.०२.२०२४ रोजी फोन आला होता आणि मला दि.१४.०२.२०२४ रोजी तपासाकामी हजर होण्यास सांगितले होते. दि. १४.०२.२०२४ रोजी ड्युटी करुन दुपारी ३.०० ते ४.०० च्या दरम्यान मी सावनेर पोलीस ठाणे येथे गेलो.

पुढे 2/-

तिथे जाऊन मी सतीश सरांना भेटलो. त्यावेळी तेथे एका महिलेचा जोरजोरात आरडा–ओरड करण्याचा आवाज येत होता. आवाजामुळे सतिश सरांनी मला रुममध्ये बसायला सांगितले आणि स्वतः काय झाले म्हणुन पाहायला रुमच्या बाहेर गेले. बाहेर जातांना सतिश सरांनी सांगितले की, तु थांब, मोकासे मॅडम आल्यावर तुझा बयाण नोंदवतील. त्यानंतर मॅडम आल्या व मला विचारले की, तु कोण आहे. मी त्यांना माझ्याबद्दल सांगितले. त्यानंतर सतिश सर परत आले व मोकासे मॅडम यांनी माझा बयाण घेणे सुरु केले. त्यानंतर आरोपी कक्षात येऊन म्हणाली की, तू माझी रेकॉर्डींग काढत आहेस, मी तुझी रेकॉर्डींग काढते. आरोपी महिला स्वतःचा मोबाईल हातात घेऊन रेकॉर्डींग करायला सुरुवात केली. आरोपीने मोकासे मॅडमला मादरचोद वगैरे अशा घाणेरड्या शिव्या दिल्या. त्यावर मॅडमने तिला 'थँक यु' असे म्हटले. त्यानंतर आरोपी महिला मोकासे मॅडमचा लॅपटॉप उचलुन फेकणार होती, त्यावेळेस सतिश सरांनी लॅपटॉप पकडले. त्यांनतर आरोपी महिला खाली झोपुन आरडा ओरडा करत होती. त्यावेळी पोलीस ठाण्याचे कर्मचारी तिथे आले व आरोपीला घेऊन कक्षाबाहेर गेले. या प्रकरणानंतर मी माझा बयाण सतिश सरांकडे नोंदवुन निघुन गेलो.

०३. पुर्वी देखील माझे बयाण दिवाणी न्यायालयात नोंदवलेले आहे. तो बयाण माझ्या सांगण्याप्रमाणे नोंद करण्यात आला होता. आता मला बयाण दि.१६.०५.२०२४ दाखविण्यात आला. हा तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ४४/PW–9** देण्यात येते.

**विद्वान सहाय्यक सरकारी वकील यांनी सांगीतले की साक्षीदार फिर्यादीच्या बाजुला पाठिंबा देत नाही आहे आणि त्यांनी साक्षीदाराला उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवाणगी मागीतली. परवाणगी देण्यात आली**.

०४. (आता साक्षीदाराला दि. १८.०२.२०२४ रोजीच्या त्याच्या बयाणातील अधोरेखीत भाग दाखविण्यात आला).सदर मजकुर बरोबर आहे आणि

पुढे 3/-

जसे लिहीले आहे तसेच झाले होते. बयाणाच्या त्या भागाला **अधोरेखीत भाग अ** देण्यात आले. हे खरे आहे की, मी दिक्षा नंदकुमार गिरगुसे यांना ओळखतो. ती आज न्यायालयात हजर नाही. हे खरे आहे की, माझा बयाण पोलीसांना दि.१८.०२.२०२४ रोजी नोंद केला होता.

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपीचे वकील श्री. पटले मार्फत शपथेवर सुरु.**

०५. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्यात मी सतिश सरांच्या कक्षात बसलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी आरडा ओरडण्याचा आवाज आला त्यावेळी मी सतिश सरांच्या कक्षातच बसलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, कक्षाच्या बाहेर जे आरडा ओरड झाला होता, त्याबद्दल सतिश सरांनी मला परत येऊन सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कंपनीच्या ड्रायव्हरचा अपघात झाल्याच्या तारखेनंतर मी पोलीस स्टेशनला गेलो होतो. त्याआधी मी कधीच पोलीस स्टेशनला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, ज्या तारखेला मी पोलीस ठाण्यात गेलो होतो त्यादिवशी तेथे पोलीसांच्या व्यतिरीक्त दुसरे लोकंही हजर होते. आरडा ओरडा केलेल्या महिलेचे नाव दिक्षा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे नाव मला पोलीसांनी सांगितले. कक्षाच्या बाहेर जो आरडा–ओरड झाला होता, त्याबद्यलची माहिती मला पोलीसांनी दिली व कक्षाच्या आतमधील घटना मी स्वतः पाहिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्या कक्षात आरोपी आली त्या कक्षात मी दारासमोर पाठ करुन बसलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, ती महिला कक्षात आली होती जिथे सतिश सर व मोकासे मॅडम होत्या, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना दिलेला बयाण मी वाचले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी या केससंदर्भात काय म्हणायचे आहे ते सांगितले होते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, पोलीसांना मला जे घडले आहे ते न्यायालयात सांगण्यास सांगितले. मला पोलीसांनी दि.१४.०२.२०२४

रोजी पोलीस ठाण्यात बयाणासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर पोलीसांना या केसच्या संदर्भात माझा कोणताही बयाण नोंदविला नाही व कधिही बोलाविले नाही. मी न्यायालयात कोणत्या तारखेला बयाण नोंदविण्यासाठी गेलो होतो हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात पोलीसांसोबत गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला सांगितले आहे की, कोणत्या पद्धतीने बयाण द्यायचा आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्या दिवशी पोलीसांनी सांगितले होते की, न्यायालयात जाऊन तु तुझा बयाण नोंदव. हे म्हणणे खरे नाही की, आज मी न्यायालयात पोली कर्मचा–यांना भेटलो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला माझा बयाण वाचुन दाखवुन व न्यायालयात साक्ष देण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी महिला कक्षात येऊन मोकासे मॅडमला मादरचोद वगैरे अशा घाणेरड्या शिव्या दिल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी महिलेने मॅडमचा लॅपटॉप उचलुन फेकण्याचा प्रयत्न केला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या  सरतपासातील मजकुर मी खोटा सांगीतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

निवेदन श्रवणोत्तर स्वीकृत केले.

Pankaj Subhashchandra Pandey

Digitally signed by Pankaj Subhashchandra Pandey
Date: 2026.07.22 16:11:59 +0530

नागपुर
दि.२२/०७/२०२६

(**पंकज सु. पांडे**)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश–२०